# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र.०६, दि. २५.०७.२०२२

जा. क्र. ग.बॅ.स./सभा६/२०२२/ दिनांक – २५.०७.२०२२

**नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र. ०६**
दिनांक - **सोमवार – दि. २५.०७.२०२२**
वेळ - **सकाळी ११.१५** वाजता
स्थळ - **साखर संकुल, शिवाजीनगर ,पुणे**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) ची सहावी सभा सोमवार दि. २५.०७.२०२२ रोजी सकाळी ११.१५ वाजता मा. दिलीप वळसे-पाटील साहेब - चेअरमन, नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**विषय-पत्रिका**

| विषय | विषय | पान. क्र. |
|---|---|---|
| विषय क्र.०१. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्रं.०५ दि.०९.०५.२०२२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | |
| विषय क्र.०२. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्रं.०५ दि. ०९.०५.२०२२ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. | |
| विषय क्र.०३. | महाविद्यालयामधील सेवकांनी दिलेल्या निवेदनाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र.०४. | महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र.०५. | महाविद्यालयामधील वेगवेगळ्या पदावर काम करत असलेल्या शिक्षकांचा त्या पदाचा कालावधी पूर्ण झालेने नवीन शिक्षकांच्या नियुक्ती बाबत चर्चा करणे.<br>• **Dean Academics** प्रा. ए. बी. देगावकर यांनी दिलेल्या राजिनाम्या बाबत चर्चा करणे | |
| विषय क्र.०६. | महाविद्यालयातील प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडणेसाठी **Dean Administration** या पदाची तरतूद करून त्या पदावर प्राध्यापक नियुक्ती बाबत चर्चा करणे. | |

| | | |
|---|---|---|
| विषय क्र.०७. | प्राध्यापक डॉ. डी. एस. आलदर यांनी प्राचार्य व रयत शिक्षण संस्था यांना केलेल्या विविध पत्रव्यवहाराबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र.०८. | **DBATU** च्या नवीन **Statutes** नुसार प्राध्यापकांना कार्यभार देणे व प्राध्यापकांना **Research Activities** वाढविणेसाठी **Target** देणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र.०९. | माहाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक श्री. सी. व्ही. सावळे यांचे अर्जित रजारोखीकरण प्रस्तावावर चर्चा करून निर्णय घेणे. | |
| विषय क्र.१०. | प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेमध्ये असणाऱ्या Institute Seats Surrender करणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र.११. | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी आवश्यक असणाऱ्या AD-HOC शिक्षकांच्या नेमणूका व त्यांच्या वेतनास मंजुरी घेणे. | |
| विषय क्र.१२. | महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील प्लेसमेंट बाबत सभेस माहिती देणे. | |
| विषय क्र. १३. | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबींविषयी मंजुरी घेणे.** | |
| विषय क्र. १३.०१ | महाविद्यालयामध्ये घेणेत येत असलेल्या NEET परीक्षेसाठी नविन नियमानुसार सर्व वर्ग खोल्यामध्ये पूर्व परवानगी घेऊन बसवलेल्या CCTV च्या खर्चास मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १३.०२ | महाविद्यालयातील कार्यालयामध्ये इलेक्ट्रिक बॅकअप सेवा उपलब्ध करणेसाठी बॅटरी खरेदी करणेस मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १३.०३ | Ion**CUDOS Software** खरेदी करणेबाबत चर्चा करणे | |
| विषय क्र. १३.०४ | कॉम्प्युटर, सिव्हील व मेकॅनिकल विभागामध्ये **Lab Development** साठी नवीन कॉम्प्युटर व इतर बाबी खरेदीस मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १३.०५ | कॉम्प्युटर विभागाचे नूतनीकरण करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १३.०६ | महाविद्यालयातील **Auditorium** अद्यावत करणेसाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे. | |

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग सातारा



| | | |
|---|---|---|
| विषय क्र. १३.०७ | सिव्हील विभागामध्ये Transportation Lab व विभागप्रमुख दालन अद्यावत करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे. | |
| विषय क्र. १४ | महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांच्या १२ वर्ष कालबध्द पदोन्नती संदर्भात रयत शिक्षण संस्थेकडून आलेल्या पत्राबाबत | |
| विषय क्र. १५. | मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे | |

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सातारा

**प्रति,**

सर्व सन्माननिय नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सदस्य

**सोबत :-** १) विषयावरील टाचण,  २) मागील सभेचा इतिवृत्तांत

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

## नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०६. दि. २५.०७.२०२२ इतिवृत्तांत

जा.क्र.ग.बॉ.स./सभा६/२०२२/ दिनांक-२५/०७/२०२२

**नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)**
**सभा क्र - ०६**
**दिनांक - २५.०७.२०२२**
**वेळ - सकाळी ११.१५ वाजता**
**स्थळ - साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे**

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सातारा या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची सहावी सभा दि. २५.०७.२०२२ रोजी सकाळी ११.१५ वाजता साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे येथे मा. दिलीप वळसे पाटील, चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित सदस्य –

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १ | मा. दिलीप वळसे पाटील | चेअरमन |
| २ | मा. सहसचिव ( उ. शि)<br>रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ३ | मा. डॉ. एन. बी. पासलकर | सदस्य |
| ४ | मा. श्री. उदय जाधव | सदस्य |
| ५ | डॉ. डी. व्ही. जाधव | सदस्य |
| ६ | डॉ. एच. ए. मांडवे | सदस्य |
| ७ | डॉ. एस. व्ही. माने | सदस्य |
| ८ | प्रि. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य सचिव |

नियामक मंडळाचे इतर सर्व सदस्य यांनी त्यांच्या काही अपरिहार्य व पूर्वनियोजित कारणास्तव सभेस उपस्थित राहता येत नाही. असे कळविल्यानुसार त्यांची सभेच्या अनुपस्थितिची रजा मंजूर करण्यात आली.

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

***नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०६. दि. २५.०७.२०२२ इतिवृत्तांत***

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि मा.दिलीप वळसे-पाटील, महाविद्यालय नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्र.१. :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र. ०५, दि. ०९.०५.२०२२ चा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. ०१.** :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्र. **०५**, दिनांक **०९.०५.२०२२** रोजीचा इतिवृत्तांत सोबत आपल्या अवलोकनार्थ जोडला आहे. सदर इतिवृत्तांचे सभेने अवलोकन केले. तसेच त्यास मंजुरी देण्यात आली.

**सूचक -: डॉ .ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: डॉ. एच. ए. मांडवे**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. २ :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०५., दि. ०९.०५.२०२२ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.**

**ठराव क्र. ०२.** :- मागील नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०५., दि. ०९.०५.२०२२ मध्ये घेणेत आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| विषय क्र.०१. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) इतिवृत्तांत वाचून कायम करणे तसेच निर्णयावरील कार्यवाहीची सभेने नोंद घेतली. | नोंद घेण्यात आली. |
| विषय क्र. ०२. | मागील नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी) सभा क्रं.**०५** दि.**०९.०५.२०२२** रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयावरील केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. | नोंद घेण्यात आली. |
| विषय क्र. ०३ | माहे ०१/१०/२०२१ ते ३०/०३/२०२२ अखेरच्या तेरीजपत्रकास व सन २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकास | मंजुरी देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | सभेची मंजूरी घेणे. | |
| विषय क्र. ०४ | महाविद्यालयाच्या शै. वर्ष २०२१-२०२२ च्या प्रवेशाबाबतची सभेस माहिती देणे. | नोंद घेण्यात आली. |
| विषय क्र. ०५ | महाविद्यालयाच्या आर्थिक स्थितीविषयी सभेस माहिती देणे व सन २०२०-२०२१ च्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालावर चर्चा करणे. | आढावा घेणेत आला. |
| विषय क्र. ०६ | महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट बाबत सभेस माहिती देणे. | नोंद घेण्यात आली. |
| विषय क्र. ०७ | महाविद्यालयाच्या NBA मानांकन कामकाजाची सभेस माहिती देणे. | नोंद घेण्यात आली. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| विषय क्र. ०८ | मा. अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था यांचे सुचनेनुसार महाविद्यालयामध्ये शै. वर्ष २०२२-२०२३ पासुन Artifical Intelligence हा कोर्स सुरू करणेबाबत चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली. तसेच NBA झाल्यानंतर सदरचा कोर्स सुरु करणेचे ठरले. |
| विषय क्र. ०९ | कार्यालयीन सेवक व सॉफ्टवेअर डेव्हलपर्स नियुक्तीसाठी केलेल्या कार्यवाहीची सभेस माहिती देणे. | नोंद घेण्यात आली. व मुलाखती घेऊन सेवकांची नियुक्ती करण्यासंदर्भात संस्थेस पत्र देण्यात आले. |
| विषय क्र. १० | महाविद्यालयाचे प्रबंधक यांचे मागील संस्थेतील वेतन संरक्षित करणेबाबतच्या अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. चर्चा करून निर्णय घेणेत आला. |
| विषय क्र. ११ | महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांच्या १२ वर्ष कालबध्द पदोन्नती बाबात चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. प्रस्ताव संस्थेकडे पाठविणेत आला आहे. |
| विषय क्र.१२ | महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक श्री. चंद्रकांत व्ही. हत्ते यांचे अर्जित रजारोखीकरण प्रस्तावावर चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. व मंजूर करणेत आली. |
| विषय क्र. १३ | महाविद्यालयातील हंगामी / रोजंदारी तत्वावर काम करणाऱ्या सेवकांचे मानधनाबाबात धोरण ठरविणेसाठी गठीत केलेल्या समितीच्या अहवालावर चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. व मान्यता देणेत आली |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

| | | |
|---|---|---|
| विषय क्र. १४ | महाविद्यालय Professional पध्दतीने चालवणेसाठी स्वतंत्र नियमावली तयार करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. व Professional पध्दतीने चालवणेसाठी सर्व अधिकार BOG ला देणेत आले. |
| विषय क्र. १५ | महाविद्यालयामधील सेवकांनी दिलेल्या निवेदनाबाबत चर्चा करणे.<br>अ. महागाई भत्ता वाढ,<br>ब. सातवा वेतन आयोग लागु करणे.<br>क. वेतन फरक मिळणे.<br>ड. शिक्षक सेवकांचे CAS अंतर्गत AGP बदल | नोंद घेण्यात आली. ११९ % DA ने लागू करणेत आला. |
| विषय क्र. १६ | श्री. डी. बी. देवी यांनी पाठवलेल्या विविध ईमेल बाबात माहिती देणे. | नोंद घेण्यात आली. |
| विषय क्र. १७ | निलंबित सेवक श्री. मनोहर कदम यांनी सादर केलल्या अर्जावर चर्चा करणे. | नोंद घेण्यात आली. व सदरचा अर्ज मा. सचिव साहेबांनी संस्थेच्या कायदा विभागाकडे पाठविणेत आलेले आहे. |
| **विषय क्र. १८** | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबींविषयी मंजुरी घेणे.** | -- |
| १८.१ | शै. वर्ष २०२०-२१ च्या कर्मवीर स्कॉलरशिपच्या खर्चास सभेची मंजूरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली |
| १८.२ | प्रवेश समितीच्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यांना फि सवलत देणेबाबात चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. |
| १८.३ | सन २०११ पासुनचा Income Tax व GST दंड भरणेस सभेची मंजूरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली |
| १८.४ | सन २०२०-२०२१ मधील अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जादा खर्चास सभेची मंजूरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली |
| १८.५ | सॉफ्टवेअर डेव्हलमेंट सेलच्या सन २०२१-२०२२ च्या जमा-खर्चास सभेची मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली |
| १८.६ | विद्यार्थ्यांना प्रोजेक्टसाठी द्यावयाच्या खर्चास सभेची मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली |
| १८.७ | महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन करणेस व | नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | त्यासाठी येणाऱ्या खर्चास सभेची मंजुरी घेणे. | मंजुरी दिली |
| १८.८ | महाविद्यालयातील बेंच खरेदीसाठी च्या वाढीव खर्चास सभेची मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली. तसेच कार्यवाही सुरु झाली आहे. |
| १८.९ | महाविद्यालयाच्या वसतीगृह दुरूस्ती बाबत चर्चा करणे व खर्चास सभेची मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली. |
| १८.१० | महाविद्यालयाच्या वसतीगृहामधील विद्यार्थ्यांची कोरोना काळातील वसतीगृह फी परत देणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली. |
| १८.११ | महाविद्यालयाच्या झेरॉक्स सेंटरचे कोरोना काळातील भाडे माफ करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली. |
| १८.१२ | महाविद्यालयास विहीत पध्दतीने नवीन ठेकेदार नियुक्ती होईपर्यत सुरक्षा रक्षक पुरवठा करणाऱ्या सध्याच्या पुरवठाधारकास आहे त्याच दराने सदरची सेवा सुरू ठेवण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास सभेची मंजूरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली. |
| १८.१३ | महाविद्यालयास विहीत पध्दतीने नवीन ठेकेदार नियुक्ती होईपर्यत इंटरनेट पुरवठा करणाऱ्या सध्याच्या पुरवठाधारकास आहे त्याच दराने सदरची सेवा सुरू ठेवण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास सभेची मंजूरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली. |
| १८.१४ | महाविद्यालयामध्ये NBA साठी विविध प्रकारचे बोर्ड / फ्लेक्स लावणेसाठीच्या खर्चास सभेची मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. मंजुरी दिली. कार्यवाही सुरु आहे. |
| १८.१५ | महाविद्यालयातील परीक्षा विभागासाठी, आय.टी. सेल व कार्यालयासाठी तसेच सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेल यासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याच्या खरेदीस व खर्चास सभेची मंजुरी घेणे. | नोंद घेण्यात आली. सभेने मंजुरी दिली. |
| **विषय क्र. १९** | मा.चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे. | -- |
| १९.१ | फायर सेफ्टीसाठी लिफ्ट बसवणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणेबाबत | नोंद घेण्यात आली. सभेने मंजुरी दिली. |
| १९.२ | महाविद्यालयातील कपजेमिनी सेंटर सुरु करणे व त्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळा अद्यावत करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे. | नोंद घेण्यात आली. सभेने मंजुरी दिली. |
| १९.३ | महाविद्यालयात इमारत अद्यावत करणेबाबत चर्चा करून | नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | निर्णय घेणे. | सभेने मंजुरी दिली. |
| १९.४ | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी नियुक्ती करणेत येणाऱ्या AD-HOC शिक्षकांना संस्थेचा PF चालू करणेबाबत. | नोंद घेण्यात आली. सभेने मंजुरी दिली. |

त्यानुसार मागील नियामक मंडळ सभा क्र. ०५ दि. ०९.०५.२०२२ रोजीचा इतिवृतांत मंजूर करणेत आला व कार्यवाहीची नोंद घेणेत आली.

**सूचक -: डॉ. सौ. एस. व्ही. माने**
**अनुमोदक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. ३ :- महाविद्यालयामधील सेवकांनी दिलेल्या निवेदनाबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ०३** :- महाविद्यालयातील सेवकांची खालील विषयासंदर्भात निवेदने / पत्रे दिलेली आहेत त्याबाबत मार्गदर्शन मिळावे.

१. बोर्ड ऑफ गव्हर्नन्स व महाविद्यालय विकास समिती यांचे कार्य कक्षेबाबत.
२. महाविद्यालय विकास समिती / स्थानिक व्यवस्थापन समिती बाबत.
३. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती करून सहयोगी प्राध्यापक पदाचे सुधारित वेतन मिळणेबाबत.
४. महाविद्यालयातील प्रा.ए. बी. पिसाळ यांच्या रोखण्यात आलेल्या वेतनवाढीबाबत.
५. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पीएचडी नंतरची इन्क्रिमेंट मिळण्याबाबत.
६. Regarding Earned Leaved as per the statues of Dr. Babasaheb Ambedkar Technological University.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील सेवकांनी दिलेल्या निवेदनाबाबत सभेने नोंद घेतली. व त्यासंदर्भामध्ये खालील त्रिसदस्यीय समिती स्थापन करून त्याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार समितीस देण्यात आले.

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा



१) मा. डॉ. एम. बी. कुमठेकर - अध्यक्ष

२) मा. यु. एल. जाधव - सदस्य

३) मा. प्रा. ए. बी. देगावकर - सदस्य सचिव

**सूचक -: डॉ .ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: प्रा. डॉ .एन. बी .पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. ०४ :- महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ०४ :-** **DBATU** च्या **Statutes** नुसार महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) व BOG असणे आवशक आहे. LMC मध्ये शिक्षकांचे ३ व शिक्षकेतर कर्मचार्यांच्या मधून १ प्रतिनिधी निवडणुकीद्वारे घ्यावयाचे असतात.

**DBATU** च्या **Local Inspection Committee** च्या report मध्ये LMC व BOG च्या मीटिंगबाबत माहिती द्यावी लागते. अशी माहिती महाविद्यालयाचे मा. प्रचार्य यांनी सभेस दिली.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करणेबाबत सभेने मार्गदर्शन केले. यामध्ये मा. दिलीप वळसे पाटील साहेब यांनी LMC व BOG या कमिटीच्या कार्यक्षेत्राबाबत विचारणा केली. दोन्ही कमिटीची कामे कोणत्या बाबतीत चालतात याचा अहवाल पुढील मिटिंग मध्ये सदर करावा अशी सूचना केली. त्यानंतर महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करणेबाबत निर्णय घेतला जाईल असे ठरले.

**सूचक -: डॉ .ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. डॉ . डी. व्ही. जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

**विषय क्र. ५ :- महाविद्यालयामधील वेगवेगळ्या पदावर काम करत असलेल्या शिक्षकांचा त्या पदाचा कालावधी पूर्ण झालेने नवीन शिक्षकांच्या नियुक्ती बाबत चर्चा करणे.**

- **Dean Academics** प्रा. ए. बी. देगावकर यांनी दिलेल्या राजिनाम्या बाबत चर्चा करणे

**ठराव क्र. ०५** :- महाविद्यालयात खालील पदावर काम करत असलेल्या प्राध्यापकांचा कार्यकाल संपलेला आहे. त्या ठिकाणी नवीन प्राध्यापक नेमणे आवश्यक आहे.

**कार्यकाल संपत असलेल्या प्राध्यापकांची माहिती खालीलप्रमाणे.**

| अ. क्र. | पदाचे नाव | प्राध्यापकाचे नाव |
|---|---|---|
| १ | कॉम्पुटर सायन्स अँण्ड़ इंजिनीरिंग HOD | प्रा. दिपाली घाटगे |
| २ | E&TCइंजिनीरिंग HOD | डॉ. सुहास पाटील |
| ३ | Training & Placement Officer | प्रा. मनोज राठोड |
| ४ | Dean Student Development | डॉ. शबिना मोदी |

१. **DBATU** च्या **Statutes** नुसार विभागप्रमुख हे पद सीनियरिटीप्रमाणे भरणे आवश्यक आहे त्यानुसार इलेक्ट्रॉनिक & टेलीकम्युनिकेशन विभागातील सिनियर प्राध्यापक श्री ननवरे जे. डी., कंप्यूटर विभागामध्ये श्री राठोड एम. एन. हे पात्र प्राध्यापक आहेत.

२.डीन स्टुडंट्स् या पदासाठी इच्छुक असलेल्या प्राध्यापकांच्यापैकी नाव निश्चित करण्यात येईल.

३. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर या पदासाठी डॉ. जाधव पी. एल. यांचे नाव सुचवण्यात येत आहे.

४. **Dean Academics** या पदावर प्रा. ए. बी. देगावकर हे कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक २८.०२.२०२२ दिवशी आपल्या **Dean Academics** या पदाचा राजीनामा सदर केला आहे. तरी त्यांचा राजीनामा स्वीकार करून नवीन व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील वेगवेगळ्या पदावर काम करण्यासाठी शिक्षकांची नेमणूक करणेसाठी सभेने मार्गदर्शन केले. त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक & टेलीकम्युनिकेशन विभागातील प्राध्यापक डॉ. आलदर डी. एस., कंप्यूटर विभागामध्ये श्री राठोड एम. एन. या पात्र प्राध्यापकांकडे विभागप्रमुख हे पद देण्यात यावे असे ठरले. **Dean Academics** या पदावर प्रा. दिपाली घाटगे यांची

नेमणूक करण्यात यावी असे ठरले. तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर या पदासाठी स्वतंत्र उमेदवारची निवड करावी असे ठरले.

**सूचक -: डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा.सहसचिव, (उ.शि)**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. ६ :- महाविद्यालयातील प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडणेसाठी Dean Administration या पदाची तरतूद करून त्या पदावर प्राध्यापक नियुक्ती बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ०६** :- महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. गणेश सुरवसे यांनी राजीनामा दिल्यामुळे, प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. विद्यापीठाच्या नवीन नियमावलीनुसार प्रबंधक हे पद ४००० पेक्षा अधिक विद्यार्थी असलेल्या महाविद्यालयास मंजूर होत आहे. त्यामुळे नवीन प्रबंधक लगेच नेमता येणार नाही. महाविद्यालयातील प्रशासन सुरळीतपणे पार पडण्यासाठी **Dean Administration** या पदाची तरतूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे या पदावर नियमित काम करत असलेले व प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्याची कार्यक्षमता असणाऱ्या प्राध्यापकाची नेमणूक करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयामध्ये विद्यापीठाच्या नवीन नियमावलीनुसार प्रबंधक हे पद भारने शक्य नसल्याने **Dean Administration** या पदाची तरतूद करणेस सभेने परवानगी दिली. या पदावर काम करण्यासाठी अनुभवी प्राध्यापक डॉ. मोदी एस. जे. यांचे नाव सर्वानुमते निश्चित करणेत आले.

**सूचक -: प्रा. डॉ. एच. ए. मांडवे**
**अनुमोदक -: मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

<u>*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०६. दि. २५.०७.२०२२ इतिवृत्तांत*</u>

**विषय क्र. ७ :- प्राध्यापक डॉ. दिलीप संपत्ती आलदर यांनी प्राचार्य व रयत शिक्षण संस्था, सातारा यांना केलेल्या विविध पत्रव्यवहाराबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ०७** :- १. प्राध्यापक डॉ. डी. एस. आलदार यांनी प्राचार्य, सचिव, सहसचिव रयत शिक्षण संस्था यांना सहयोगी प्राध्यापक (असोसिएट प्रोफेसर) पदाचे स्केल संदर्भामध्ये वारंवार मेल केले आहेत. या मेल मध्ये त्यांनी सहयोगी प्राध्यापक (असोसिएट प्रोफेसर) पदाचे स्केल लागू न केल्यास मी **AICTE, DTE, DBATU** यांच्याकडे तक्रार देणे संदर्भात नमूद केले आहे. तसेच त्यांनी सहयोगी प्राध्यापक पदाचे स्केल लागू न केल्यास गांधीवादी पद्धतीने उपोषणास बसण्याचा इशारा कॉलेज प्रशासनास दिला आहे. तसेच यासाठी फक्त आणि फक्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. सी. आत्तार हेच जबाबदार असतील असे नमूद केलेले आहे आणि याला रयत शिक्षण संस्था जबाबदार असणार नाही असेही नमूद केलेले आहे.

२. त्यांना महाविद्यालयामध्ये सध्या वापरत असलेले शिक्षक बैठक दालन रिकामे करून दुसरे शिक्षक दालनामध्ये स्थलांतरित होण्यासाठी त्यांचे विभाग प्रमुख व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मार्फत सूचित करण्यात आलेले होते. परंतु या सूचनेचे पालन न करता त्यांनी या संदर्भात देखील विविध प्रकारचे मेल प्राचार्य, सचिव व सहसचिव, रयत शिक्षण संस्था यांना केलेले आहेत. तसेच या संदर्भातही आपण गांधीवादी पद्धतीने उपोषण करू अशी धमकी त्यांनी प्रशासनास दिलेली आहे.वरील दोन्ही बाबी प्रशासनाच्या दृष्टीने अतिशय गंभीर स्वरूपाच्या आहेत. याबाबत संस्था स्तरावर त्यांना समज देणे अत्यंत गरजेचे आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार होऊन योग्य ते मार्गदर्शन मिळावे.

त्यांनी पाठवलेल्या सर्व ई-मेल चा वृतांत मा. प्राचार्य यांनी साभेस दिला. उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. डी. एस. आलदर यांनी पाठवलेल्या ई - मेल ची सभेने गांभीर्याने नोंद घेतली. त्यासंदर्भामध्ये संस्था स्थरावर चर्चा करणेसाठी मा. सहसचिव (उ.शि) यांनी सभेमध्ये डॉ. आलदर यांना मला भेटावयास संस्था कार्यालयात पाठवावे असे सांगितले. त्याप्रमाणे डॉ. आलदर यांना मा. सहसचिव (उ.शि) यांना भेटण्यास पाठविण्याचे ठरले. तसेच त्यासंदर्भात खालील त्रिसदस्यीय समिती स्थापन करून त्याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार समितीस देण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. एम. बी. कुमठेकर | - चेअरमन |
| २) | मा. यु. एल. जाधव | - सदस्य |
| ३) | मा. प्रा. ए. बी. देगावकर | - सदस्य सचिव |

**सूचक -: डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

**विषय क्र. ८ :-** DBATU च्या नवीन **Statutes** नुसार प्राध्यापकांना कार्यभार देणे व प्राध्यापकांना **Research Activities** वाढविणेसाठी **Target** देणेबाबत चर्चा करणे.

**ठराव क्र. ०८ :-** DBATU च्या नवीन **Statutes** नुसार प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांना खालील प्रमाणे कार्यभार देणे सुचित करण्यात आले आहे.

१. प्राचार्य - ४ तास

२. विभाग प्रमुख - १४ तास

३. प्राध्यापक - १४ तास

४. सहयोगी प्राध्यापक - १६ तास

५. सहाय्यक प्राध्यापक - १८ तास

वरील पद्धतीने कार्यभार देण्यात यावा असे **Statutes** मध्ये सुचित करण्यात आले आहे. तसेच महाविद्यालयामध्ये इतर पदावर कार्यरत असलेल्या प्राध्यापकांचा कार्यभार त्यांना अतिरिक्त काम करावे लागत असल्यामुळे खालील प्रमाणे देण्यात यावा असे सुचवण्यात येत आहे.

१. **All Dean's** - १४ तास

२. **TPO** - १४ तास

३. **COE** - १४ तास

४. **IT CELL Head** - १४ तास

५. **IQAC Coordinator** - १४ तास

६. **Head Research Committee** - १४ तास

मा. प्राचार्य यांनी वरील प्रमाणे कार्यभार देण्यास मान्यता मिळावी अशी शिफारस सभेस केली.

तसेच महाविद्यालयांमध्ये रिसर्च ॲक्टिव्हिटी वाढवणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक विभागाला व वैयक्तिक प्राध्यापकाला रिसर्च व इतर बाबतीत खालीलप्रमाणे टारगेट देणे आवश्यक आहे. त्या बाबतचा खालील आराखडा मा. प्राचार्य यांनी सभेसमोर मांडला.

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

***नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०६. दि. २५.०७.२०२२ इतिवृत्तांत***

१. प्रत्येक विभागाने दरवर्षी एक पेटंट करणे आवश्यक आहे.

२. प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक यांनी दरवर्षी दोन रिसर्च पेपर्स रेप्यूटेड जर्नल मध्ये पब्लिश करणे व एक स्पॉन्सर प्रोजेक्ट मिळवणे.

३. प्रत्येक विभागामध्ये एक इंडस्ट्रीज स्पॉन्सर प्रयोगशाळा बनवणे.

४. प्रत्येक विभागामध्ये दरवर्षी एक **FDP** प्रोग्रॅम आयोजित करणे.

५. प्रत्येक सहाय्यक प्राध्यापकानी किमान एक रिसर्च पेपर रेप्यूटेड जर्नल मध्ये पब्लिश करावा.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील प्राध्यापकांना **DBATU** च्या नवीन **Statutes** नुसार कार्यभार देणे बाबत सभेने नोंद घेतली व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना उपरोक्त प्रमाणे **DBATU** च्या नवीन **Statutes** नुसार कार्यभार देण्याबाबत सूचना करणेत आली.

**सूचक -: मा. उदय जाधव**
**अनुमोदक -: डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील ... सातारा

**विषय क्र. ९ :- महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक श्री. सी. व्ही. सावळे यांचे अर्जित रजारोखीकरण प्रस्तावावर चर्चा करून निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ०९ :-** या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवक श्री. सी. व्ही. सावळे – लखु टंकलेखक हे महाविद्यालयातून दि. ३१.१२.२०२१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. श्री. सी. व्ही. सावळे यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी त्यांचे रजाखातेवर १०७ रजा शिल्लक आहेत. नियमानुसार नॉन व्हेकेशनल कर्मचा-यांना शिल्लक असलेल्या अर्जित रजेचे रजारोखीकरण दिले जाते. श्री. सी. व्ही. सावळे यांनी सदर रजांचे रजारोखीकरण मिळणेसंदर्भात संस्था कार्यालयास अर्ज सादर केला आहे. त्यास अनुसरून मा. सचिव याचे पत्र क्र. उ.शि. / १९६५ दि. ३०.०५.२०२२ नुसार सदर विषय नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) समोर ठेवुन जो निर्णय होईल त्याची माहिती संस्था कार्यालयास कळवणे संदर्भात सूचित केले आहे. श्री. सी. व्ही. सावळे यांचे राजा रोखीकारणाची रक्कम रू. २,५८,०३८/- इतकी आहे. श्री. सी. व्ही. सावळे यांचे एकून सेवाकालातील कामकाज समाधानकारक असलेने श्री. सी. व्ही. सावळे यांना नियमानुसार राजारोखीकरण देण्यात यावे अशी विनंती मा. प्राचार्य यांनी सभेस केली. यास सभेने मंजुरी दिली.

**सूचक -: डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. १० :- प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेमध्ये असणाऱ्या Institute Seats Surrender करणेबाबत.**

**ठराव क्र. १० :-** महाविद्यालामध्ये प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेमध्ये असणाऱ्या Institute Seats या मा. डॉ. पासलकर सर व मा. सचिव रयत शिक्षण संस्था यांच्याशी तोंडी चर्चा करून शैक्षणिक वर्ष २०२२ - २३ साठी Surrender करणेसाठी Online पद्धतीने अर्ज कारणेत आलेला आहे. याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सभेस दिली.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेमध्ये असणाऱ्या Institute Seats Surrender करणेबाबत सभेने नोंद घेतली.

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०६. दि. २५.०७.२०२२ इतिवृत्तांत*

**सूचक -: डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. श्री. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. ११ :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी आवश्यक असणाऱ्या AD-HOC शिक्षकांच्या नेमणूका व त्यांच्या वेतनास मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. ११ :-** शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी या महाविद्यालयामध्ये विविध विभागामध्ये AD-HOC प्राध्यापकांची आवशकता आहे. त्यासाठी महाविद्यालयामध्ये आवश्यक प्राध्यापकांची जाहिरात देऊन online पद्धतीने अर्ज मागवले होते. अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांच्या तज्ञ समितीमार्फत दि. १३.०७.२०२२ व १४.०७.२०२२ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये संस्था नियमाप्रमाणे मुलाखती घेऊन योग्य प्राध्यापकांची निवड करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या उमेदवारांना ३०.०३.२०२२ च्या BOG मध्ये ठरलेल्या पगारवाढीच्या सूत्रानुसार अनुभव व मागील शैक्षणिक वर्षातील कामगिरी याचा विचार करून सोबत जोडलेल्या यादीनुसार पगाराची शिफारस करणेत येत आहे. त्यास मंजुरी देण्यात यावी हि विनंती.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील विविध विभागामध्ये AD-HOC शिक्षकांची आवशकतेनुसार त्या सेवकांच्या नेमणुका करण्यास व त्यांच्या वेतनास सभेने मंजुरी दिली.

**सूचक -: प्रि. डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

**विषय क्र. १२ :- महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील प्लेसमेंट बाबत सभेस माहिती देणे**

**ठराव क्र. १२** :- या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटसाठी विविध कंपनीमध्ये १०४ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट झालेली आहे. यामध्ये Wipro, Capgemini, TCS, Infosys, Zensar, Congizant इ. नामवंत कंपनीनचा समावेश आहे. यामध्ये सर्वात जास्त 9.5 लाख पर्यंत Annual Package मिळालेले आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमांचे नाव | २०२१-२२ |
|---|---|---|
| १ | कॉम्पुटर सायन्स अँण्ड़ इंजिनीरिंग | ४८ |
| २ | E&TCइंजिनीरिंग | २४ |
| ३ | मेकॅनिकॅल इंजिनीरिंग | १४ |
| ४ | सिव्हील इंजिनीरिंग | १८ |
| | **एकूण** | **१०४** |

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटबाबत सभेने नोंद घेतली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट अधिक होण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत असे ठरले.

**सूचक -: प्रि. डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. १३ :- महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबींविषयी मंजुरी घेणे.**

**विषय क्र. १३.१** :- महाविद्यालयामध्ये घेणेत येत असलेल्या NEET परीक्षेसाठी नविन नियमानुसार सर्व वर्ग खोल्यामध्ये पूर्व परवानगी घेऊन बसवलेल्या CCTV च्या खर्चास मंजुरी घेणे.

**ठराव क्र. १३.१** :- नीट परीक्षा रविवार दिनांक १७ जुलै २०२२ रोजी पार पडली. महाविद्यालयांमध्ये घेण्यात आलेल्या नीट परीक्षेसाठी नवीन नियमानुसार सर्व वर्ग खोल्यां मध्ये सीसीटीव्ही बसवणे अत्यंत गरजेचे होते. त्यानुसार गव्हर्निंग बॉडीचे चेअरमन यांच्या पूर्वपरवानगी घेऊन संस्थेने

ठरवलेल्या अधिकृत विक्रेत्याकडून सीसीटीव्ही खरेदी करण्यात आलेले आहेत. त्यासाठी रक्कम रुपये १ लाख ४४ हजार ७१२ इतका खर्च झालेला आहे. सदर खर्चास त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली .

**विषय क्र. १३.२** - महाविद्यालयातील कार्यालयामध्ये इलेक्ट्रिक बॅकअप सेवा उपलब्ध करणेसाठी बॅटरी खरेदी करणेस मंजुरी घेणे.

**ठराव क्र. १३.२** :- महाविद्यालयातील कार्यालयामध्ये कॉम्पुटर वरती विविध कामे सुरु असतात. वेगवेगळ्या समितींचे अहवाल DTE, AICTE, DBATU इ ना वेळेवर व Online पद्धतीने पाठवावे लागतात. त्यामध्ये अखंड विद्युत पूरवठा असणे अत्यंत आवश्यक असते. यामुळे कार्यालयामध्ये इलेक्ट्रिक बॅकअप सेवा उपलब्ध करणेसाठी Battery खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी अंदाजे रू. ५००००/- इतका खर्च येणार आहे त्यास सभेने मंजुरी दिली.

**विषय क्र. १३.३** - IonCUDOS Software खरेदी करणेबाबत चर्चा करणे.

**ठराव क्र. १३.३** :- महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाज उंचावण्यासाठी व **Outcome Based Learning (OBE)** करणेसाठी हे सॉफ्टवेअर अत्यंत उपयुक्त आहे. तसेच **NBA** च्या कार्यपद्धती व डॉक्युमेंटेशन सुरळीतपणे पार पाडण्यासाठी हे सॉफ्टवेअर उपयुक्त आहे. तसेच **DBATU** विद्यापीठामध्ये देखील हे सॉफ्टवेअर विकत घेतलेले आहे. या सॉफ्टवेअरचे डेमोस्ट्रेशन सर्व विभाग प्रमुख व काही शिक्षक यांनी पाहिलेले आहे. सर्व विभाग प्रमुखांनी व शिक्षकांनी हे सॉफ्टवेअर विकत घेणे बाबत शिफारस केली आहे. शिफारस पत्र माहितीसाठी सोबत जोडले आहे. या सॉफ्टवेअरसाठी रक्कम रू. ५ लाख ५० हजार + जीएसटी इतका खर्च येणार आहे. अशी माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली.

उपरोक्त **Software** खरेदी करणेबाबत सभेमध्ये चर्चा करणेत आली. त्यामध्ये जॉईन्ट डायरेक्टर मा. व्ही. डी. जाधव यांनी Ion**CUDOS** या सॉफ्टवेअर ऐवजी RWork Integreted

Institute Management हे सॉफ्टवेअर जास्त उपयोगी असून ते महाराष्ट्रामध्ये बरेच कॉलेज मध्ये वापरले जात आहे अशी माहिती सभेस दिली. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील हे सॉफ्टवेअर घेणेबाबत मार्गदर्शन केले आहे. त्यामध्ये OBE आणि NBA च्या तयारीसाठी हे अत्यंत उपयोगी सॉफ्टवेअर आहे. त्यामुळे हे सॉफ्टवेअर खरेदी करावे आशा सूचना जॉईन्ट डायरेक्टर मा. व्ही. डी. जाधव यांनी दिल्या. त्यानुसार RWork Integreted Institute Management हे सॉफ्टवेअर घेण्याचे ठरले त्यास सभेने मंजुरी दिली.

**विषय क्र. १३.४ - कॉम्प्युटर, सिव्हील, मेकॅनिकल विभागामध्ये Lab Development साठी नवीन कॉम्प्युटर व इतर बाबी खरेदीस मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १३.४** :- उपरोक्त प्रमाणे Lab Development साठी ५० कॉम्प्युटरची आवशकता आहे. यासाठी अंदाजे ३४ लाख रुपये इतका खर्च येणार आहे. अशी माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली. त्यास सभेने मंजुरी दिली.

**विषय क्र. १३.५ - कॉम्प्युटर विभागाचे नूतनीकरण करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १३.५** :- कॉम्प्युटर विभागाचा Intake ६० वरून १२० करणेत आलेला आहे. त्यामुळे कॉम्प्युटर विभागाचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. यामध्ये अलुमिनिउम Partition व Windows बसवने तसेच दोन lab मध्ये Furniture करणे व फरशी बसवणे गरजेचे आहे. यासाठी अंदाजे ४३ लाख रुपये इतका खर्च येणार आहे. हा खर्च funds उपलब्धतेनुसार टप्याटप्याने करण्यात येणार आहे.

उपरोक्त प्रमाणे कॉम्प्युटर विभागाचे नूतनीकरण करण्यासाठी येणाऱ्या खर्चास funds उपलब्धतेनुसार टप्याटप्याने करण्यास सभेने परवानगी दिली.

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०६. दि. २५.०७.२०२२ इतिवृत्तांत*

**विषय क्र. १३.६ - महाविद्यालयातील Auditorium अद्यावत करणेसाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे.**

**ठराव क्र. १३.६** :- उपरोक्त विषयाप्रमाणे महाविद्यालयातील **Auditorium** अद्यावत करणे गरजेचे आहे. यासाठी अंदाजे २७ लाख रुपये इतका खर्च येणार आहे. हा खर्च funds उपलब्धतेनुसार टप्याटप्याने करण्यात येणार आहे. त्यास सभेने मंजुरी द्यावी हि विनंती.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील **Auditorium** अद्यावत करण्यासाठी येणाऱ्या खर्चास funds उपलब्धतेनुसार टप्याटप्याने करण्यास सभेने परवानगी दिली.

**विषय क्र**. **१३.७** :- सिव्हील विभागामध्ये **Transportation Lab** व विभागप्रमुख दालन अद्यावत करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी घेणे.

**ठराव क्र.१३.७**:- उपरोक्त विषयाप्रमाणे महाविद्यालयातील सिव्हील विभागामध्ये **Transportation Lab** व विभागप्रमुख दालन अद्यावत करणे गरजेचे आहे. यासाठी अंदाजे १४ लाख रुपये इतका खर्च येणार आहे. हा खर्च लोकवर्गणीतून करण्यात येणार आहे. अशी माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली.

उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयातील सिव्हील विभागामध्ये **Transportation Lab** व विभागप्रमुख दालन अद्यावत करण्यासाठी येणारा खर्च लोकवर्गणीतून करण्यास सभेने परवानगी दिली.

उपरोक्त प्रमाणे विषय क्र. १३.०१ ते १३.०७ च्या खरेदीस/खर्चास सभेने मंजुरी दिली .

**सूचक -: मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक -: मा. आ. श्री. दिलीप वळसे पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

<u>*नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) सभा क्र. ०६. दि. २५.०७.२०२२ इतिवृत्तांत*</u>

**विषय क्र. १४ :- महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांच्या १२ वर्ष कालबध्द पदोन्नती संदर्भात रयत शिक्षण संस्थेकडून आलेल्या पत्राबाबत**

**ठराव क्र :- १४ :-** उपरोक्त विषयाबाबत मा. सहसचिव (उ. शि), रयत शिक्षण संस्था सातारा यांचेकडील पत्र जा. नं. उ. शि. ४५४९, दि. २०.०७.२०२२ च्या पत्रानुसार महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांच्या १२ वर्ष कालबद्ध पदोन्नती बाबत महाविद्यालयाच्या नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) च्या सभेमध्ये सदरच्या सेवकांचा आश्वासित प्रगती योजना पहिला लाभाच्या प्रस्तावाची मान्यता घेण्याबाबत कळविणेत आलेले आहे. याबाबतची माहिती महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस दिली व सभेने त्यास मंजुरी दिली.

**सूचक -: प्रिं. डॉ. ए. सी. अत्तार**
**अनुमोदक -: मा. श्री. दिलीप वळसे पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर.....**

**विषय क्र. १५ - मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.**

सन्मानीय सदस्य नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) यांचे कडून ऐनवेळी कोणताही विषय सभेमध्ये प्राप्त झाला नाही.

शेवटी सभेचे सदस्य सचिव तथा महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. ए. सी. अत्तार यांनी उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे आभार मानले व सभेचे कामकाज संपले.

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

प्राचार्य तथा सचिव
नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,सातारा.

चेअरमन
नियामक मंडळ (गर्व्हनींग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,सातारा.